


# कुशन कव्हर

## ह्या व्हिडीओमध्ये तुम्ही शिकणार आहात कुशन कव्हर कसे



तुम्ही तुमच्या खोलीचा कायापालट करू शकता अगदी सोप्या पध्दतीने. आशाजनक आहे, हो ना?

12" X 12" उशीवर बसेल होईल असे उशीचे कव्हर तयार करण्यासाठी तुम्हाला लागणारे साहित्य - 13 X 30 इंच कापड, बीड असलेल्या पिन्स, दोरे, मार्कर, फुटपट्टी.

ह्या पाठाकरिता आपल्याला सुंदर फुलं असलेले कापड घ्यावे लागेल. कापडाच्या लहान बाजूच्या काठावर दोनवेळा दुमडा... अशाप्रकारे आणि त्या जागी पिन लावा.

आपण आधी ह्या बाजूंना शिवणार आहोत. सरळ शिवण्याकरिता स्टीच पॅटर्न सेलेक्टरला ‘ए’ वर फिरवा. स्टीच लेंथ 2.5 करा आणि थ्रेड टेन्शनला 3.5 करा.

दुमडलेल्या काठांवरून काळजीपूर्वक शिवा, शिवताना पिन्स काढत चला. इतर बाजू सुद्धा शिवून घ्या.



पुढे, कपड्याला उजव्या बाजूने समोरा-समोर अर्ध्यात दुमडा. व्हिडीओमध्ये दाखविल्याप्रमाणे मध्यभागापासून 6 इंचावर खूण करा.मार्क केलेल्या खुणांना सरळ रेषेत जोडा. दुसऱ्या बाजूला सुद्धा तसेच करा.





अशाप्रकारे आखलेल्या दोन्ही रेषांवरून दुमडा. हे इथे थोडे ओव्हरलॅप होईल, ह्यामुळे ते उशीला पूर्णपणे फिट बसेल. एकमेकांवर ओव्हरलॅप झालेल्या कापडाला पिन लावा.

आता आपण ह्या दोन उघड्या काठांवरून शिवणार आहोत. जास्तीचा दोरा आणि अतिरिक्त कापड असेलेल्या ठिकाणी कापून पूर्ण करू.



आपण जे काही शिवले आहे आणि व्यवस्थित केले आहे, ते मशीनवर परत घ्या. नागमोडी शिवण्याकरिता स्टीच सेलेक्टरला ‘सी’ आणि स्टीच लेंथला 1.5 वर सेट करा. दोन्ही कडेने व्यवस्थित शिवून घ्या. असे केल्याने बाजूंना मजबूती आणि सफाईदारपणा मिळेल.
आता पिन्स काढून टाका आणि उशीच्या कव्हरची आतील बाजू बाहेर करा.








सोप्पं होतं ना? आता तुम्हाला एवढेच करायचे आहे की तुमच्या स्थानिक थोक मार्केटमध्ये जाऊन तुमच्या घराची आतील बाजू लक्षात ठेऊन सुंदर कापड आणि कॉम्बिनेशन शोधायचे आहे. आणि एकदा का तुमच्या पिशव्या भरल्या की तुम्ही सखोल विचार करू शकता आणि आपल्या दर्शनी खोलीच्या पुनर्मांडणीबद्दल पुन्हा विचार करू शकता.
उषा जानोम एझेड मशीन घरी आणा आणि आपल्या जागेचे रुपांतर करा.